उत्कृष्ठ क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

POST REGD.NO./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३०९ ■ मंगळवार ११ ऑगस्ट २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४


बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

## बॅरिकेट्स तोडत झारखंड विधानसभेकडे आक्रमक विद्यार्थ्यांवर फवाऱ्यांचा मारा

**रांची, दि.१०- झारखंड लोकसेवा आयोगाच्या भरती परीक्षांमधील कथित गैरव्यवहार आणि पेपरफुटी प्रकरणी गेल्या सतरा दिवसांपासून आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सोमवारी आक्रमक पवित्रा घेतला. विविध मागण्यांसाठी विद्यार्थ्यांनी झारखंड विधानसभेला घेराव घालण्याचा प्रयत्न केला. आंदोलकांना रोखण्यासाठी पोलिसांनी उभारलेल्या सहा बॅरिकेड्स पैकी तीन बॅरिकेड्स विद्यार्थ्यांनी तोडून पुढे कूच केले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांकडून पाण्याचे फवारे मारण्यात आले.**



रांचीतील जयपाल सिंह मुंडा स्टेडियमवर विद्यार्थी आंदोलन करीत असून, भरती परीक्षांमधील कथित गैरव्यवहारांची सीबीआय चौकशी करण्याची त्यांची प्रमुख मागणी आहे. तसेच २०१९ नंतर घेण्यात आलेल्या सर्वच प्रकारच्या परीक्षा रद्द कराव्यात. राज्यातील नोकरभरती प्रक्रियेत सुधारणा करावी. गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. वर्गनिहाय कटऑफ जाहीर करावा, ओएमआर प्रत व रिस्पॉन्स शीट उपलब्ध करून द्यावे. यूपीएससी व एसएससीच्या धर्तीवर नियमित भरती कॅलेंडर जाहीर करावे, अशा मागण्या विद्यार्थ्यांनी केल्या आहेत.

आंदोलक विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे की, सरकारने त्यांच्या सुमारे ९८ टक्के मागण्या मान्य केल्याचा दावा केला असला, तरी प्रमुख मागण्यांवर अद्याप ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे सरकारचा दावा विद्यार्थ्यांनी फेटाळून लावला आहे. दरम्यान, झारखंड लोकतांत्रिक क्रांतीकारी मोर्चाचे नेते व विद्यार्थी नेते देवेंद्रनाथ महतो हेही आंदोलनात सहभागी झाले. ते (पान ४ वर)

## साखरेनंतर गुळाला महागाईचा तडका

पुणे, दि. १० : साखरेचे दर तेजीत असताना आता गुळाच्या दरात गेल्या पंधरा दिवसांत किलोमागे सात ते आठ रुपयांनी वाढ झाली आहे. सणासुदीच्या काळात गुळाची दरवाढ झाली आहे. यापुढील काळात गुळाला मागणी वाढणार असून, दिवाळीपर्यंत गुळाचे दर तेजीत राहणार असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. श्रावण महिना गुरुवारपासून सुरू होणार आहे. श्रावण महिन्यात गुळाच्या मागणीत वाढ होणार आहे. नागपंचमी, राखीपौर्णिमा असे महत्त्वाचे सण आहेत. गणेशोत्सव, नवरात्रोत्सवानंतर दिवाळीत गुळाला उच्चांकी मागणी असते. ऊस लागवडीत घट झाल्यानंतर साखरेच्या दरात वाढ झाली. साखरेच्या दरात गेल्या महिन्याभरात किलोमागे सहा ते सात रुपयांनी वाढ झाली. ऊसाचा तुटवडा (पान ४ वर)

## कामगार, शेतकरी, शेतमजुरांच्या मागण्यांसाठी कामगार संघटना व किसान सभेचा रास्ता रोको

**धुळे, दि.१०- राज्यातील कामगार, शेतकरी आणि शेतमजुरांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी भारतीय ट्रेड युनियन केंद्र म्हणजेच सीआयटीयू आणि अखिल भारतीय किसान सभेतर्फे सोमवारी धुळ्यात रस्ता रोको आणि जेल भरो आंदोलन करण्यात आले. शहरातील संतोषी माता मंदिर चौकात सकाळी अकराला झालेल्या या आंदोलनात शेकडो शेतकरी, कामगार आणि विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.**




शेतकरी, कामगारांच्या मागण्यांसाठी आज आंदोलकांनी धुळ्यातील संतोषी माता मंदिर चौकात रस्तारोको आंदोलन करीत शासनाच्या धोरणांविरोधात निदर्शने करीत घोषणाबाजी केली. त्यानंतर जेलरोडवर मोठ्या प्रमाणात निदर्शने करण्यात आल्याने या रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी झाली. शेतीमालास उत्पादन खर्चावर आधारीत तातडीने हमीभाव द्यावा. वन जमिनींच्या वाढीव क्षेत्रासह स्वतंत्र सातबारा उतारे तयार करून अपात्र वन दावे पात्र करावेत. या आर्थिक वर्षातील बोनसची रक्कम त्वरित द्यावी तसेच किमान आधारभूत किमतीत भात खरेदी योजनेचा विस्तार करावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. याशिवाय स्मार्ट मीटर योजना बंद करून घरगुती ग्राहकांना चोवीस तास वीजपुरवठा करावा. धुळे जिल्ह्यातील खराब रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून दोषी कंत्राटदारांवर कारवाई करावी. कामगारविरोधी चार श्रमसंहिता रद्द कराव्यात आणि आठ तासांच्या कामासाठी किमान तीस हजार रुपये मासिक वेतन लागू करावे, अशी मागणी करण्यात आली. खासगी उद्योग आणि शासकीय विभागातील कंत्राटी तसेच शिकाऊ कामगारांना समान कामाला समान वेतन लागू करावे. अंगणवाडी, आशा, गटप्रवर्तक, शालेय पोषण आहार तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करून ईएसआय, पीएफ आणि पेन्शनचा लाभ द्यावा, अशीही मागणी करण्यात आली. असंघटित कामगारांसाठी स्वतंत्र सामाजिक सुरक्षा कायदा लागू करून यासाठी भरीव आर्थिक तरतूद करण्याची मागमीही आंदोलकांनी केली. या आंदोलनात भारतीय मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, आरोग्य मित्र कामगार संघटना, शालेय पोषण आहार संघटना, ॲम्बुलन्स कामगार संघटना तसेच धुळे महानगरपालिका कामगार संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलकांनी प्रशासनाला विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. मागण्या तातडीने मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही कॉ.एल.आर.राव, कॉ. दिपक सोनवणे, कॉ.शरद पाटील, कॉ.राजेंद्र चौरे, कॉ.ममता पाडवी, कॉ. लक्ष्मी पाडवी, कॉ.कुमुदिनी कुवर, कॉ.नाजमीन पिंजारी, कॉ.रत्ना शिंदे, कॉ.मिनाक्षी सोनवणे, कॉ.सीमा पाटील, कॉ. कविता अधिक यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी दिला आहे.

### नंदुरबारला किसानसभेसह सीटूतर्फे जेलभरो आंदोलन

नंदुरबार, दि.१०(प्रतिनिधी)- येथे विविध प्रलंबित मागण्यांसाठी अखिल भारतीय किसान सभा, अखिल भारतीय शेतमजूर युनियन आणि सीटूच्यावतीने सोमवारी, १० ऑगस्ट रोजी देशव्यापी जेलभरो आंदोलन करण्यात आले.या आंदोलनाचा एक भाग म्हणून करण चौफुली येथे सकाळी ११ वाजता रास्ता रोको करण्यात आला. यावेळी आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत विविध मागण्या मांडल्या. शेतीमालाला उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव द्यावा, सरकारी जमिनीवरील अतिक्रमणे नियमित करावीत, स्मार्ट मीटर बंद करावेत, गावठाण फिडरवरील लोडशेडिंग बंद करून २४ तास वीजपुरवठा करावा, तसेच महागाई आणि (पान ४ वर)

## शहाद्यात सहा मजली ब्याणव कोटींचे अद्ययावत न्यायालय, आ.राजेश पाडवींच्या प्रयत्नांना यश

**शहादा, दि.१०(का.प्र.)- येथील डोंगरगाव रस्त्यावरील सुमारे १३ हजार स्क्वेअर मीटर परिसरातील जागेवर १० हजार स्क्वेअर मीटरचे बांधकाम असलेल्या भव्य व नवीन न्यायालयीन इमारतीच्या बांधकामासाठी शासनाकडून मंजुरी मिळाली आहे. सुमारे ९२ कोटी रुपये खर्च अपेक्षित असलेल्या या ६ मजली इमारतीमुळे न्यायाधीश, वकील आणि पक्षकारांना विविध आधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहेत, अशी माहिती शहादा-तळोदा मतदारसंघाचे आमदार राजेश पाडवी यांनी दिली.**



शहादा बार असोसिएशनच्या सभागृहात यासंदर्भात माहिती देण्यासाठी आयोजित विशेष बैठकीत आमदार पाडवी बोलत होते. बैठकीस भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रा. मकरंद पाटील, भाजपाचे प्रदेश परिषद सदस्य विनोद जैन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबंधित अभियंता, शहादा बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. आनंदा निकम, ज्येष्ठ वकील ॲड. राजेश कुलकर्णी, ॲड. जसराज संचेती, ॲड. स्वर्णसिंग गिरासे, ॲड. एकनाथ पाठक, ॲड. के.एम. काझी, ॲड. वसंत पाटील, ॲड. अक्षय छाजेड, ॲड. मुश्ताक शाहीद, ॲड. प्रीतम निकम, ॲड. कपिल जयस्वाल यांच्यासह शहादा बार असोसिएशनचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माहिती देताना आमदार पाडवी यांनी सांगितले की, गेल्या काही वर्षांत झालेल्या अतिवृष्टीमुळे सध्याच्या न्यायालयाच्या आवारात पाणी साचून पक्षकारांसह वकील, न्यायाधीश व कर्मचाऱ्यांची प्रचंड गैरसोय होत होती. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शहादा बार असोसिएशनच्या वतीने मी स्वतः वेळोवेळी पाठपुरावा करून शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावास उच्च न्यायालयाकडून मान्यता मिळवून घेण्याचे महत्त्वाचे कामही करण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत होणाऱ्या या कामासाठी मंत्रालय स्तरावर सातत्यपूर्ण पाठपुरावा करून मंजुरी प्राप्त केली आहे.प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यापूर्वी म्हणजेच प्रशासकीय मान्यतेनंतर नवीन बांधकाम पूर्ण होईपर्यंत विद्यमान न्यायालयीन इमारत अन्य ठिकाणी शिफ्ट (स्थलांतरित) करावी लागणार आहे. हे स्थलांतर पूर्ण झाल्यानंतरच प्रत्यक्ष बांधकामास गती मिळणार असल्याचे आमदारांनी स्पष्ट केले.

**अशी असणार ६ मजली सुसज्ज इमारत**

तळमजल्यावर वाहनांसाठी प्रशस्त पार्किंग, पोस्ट ऑफिस, स्वागत कक्ष, हिरकणी रूम, स्टॅम्प वेंडर कक्ष व उपहारगृह राहणार आहे.इतर ५ मजल्यावर एकूण १३ कोर्ट हॉल, (पान ४ वर)

## विमलादेवी धर्मदाय रुग्णालयातून दर्जेदार आरोग्य सेवा मिळणार : ना.जयकुमार रावल

**धुळे, दि.१०- शहराच्या आरोग्य सेवेला अधिक बळकटी देण्यात सौ. विमलादेवी ओमप्रकाश अग्रवाल धर्मादाय रुग्णालय प्रभावी भुमिका निभावेल. या शिवाय धुळेकरांच्या आरोग्य सेवेसाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून अजून चार अत्याधुनिक रूग्णालये उभारण्यात येणार आहेत. विमलादेवी अग्रवाल धर्मदाय रूग्णालयात मिळणाऱ्या आरोग्य सुविधा आणि सेवा हा प्रभावी आरोग्य सेवेचा काही भाग आहे. आमदार अनुप अग्रवाल यांच्या सहकार्याने धुळ्यात अजून चांगली आरोग्य सुविधा उभारण्यात येणार आहे, असे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले. रविवारी सायंकाळी महापालिका आणि एबी फाउंडेशन यांच्या संयुक्त प्रयतनातून भाईजी नगरजवळ उभारण्यात आलेल्या पंचवीस खाटांच्या वातानुकुलीत रुग्णालयाचे लोकार्पण मंत्री रावल यांच्या हस्ते झाले.**



धुळे शहरात महापालिका आणि आ. अनुप अग्रवाल यांच्या प्रयत्नाने सौ. विमलादेवी अग्रवाल धर्मदाय (पान ४ वर)



### महिला हत्येचा उलगडा दोन तासात पतीला अटक

धुळे दि. १० (प्रतिनिधी) : साक्री तालुक्यातील वाकी शिवारात घडलेल्या महिला हत्या प्रकरणाचा पिंपळनेर पोलिसांनी अवघ्या दोन तासांत उलगडा केला आहे. शेतीच्या वादातून पतीनेच पत्नीच्या डोक्यात दगड घालून निर्घृण हत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले. संशयित आरोपी पतीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.साक्री तालुक्यातील वाकी शिवारात दहा ऑगस्टला शेतात (पान ४ वर)

## बायोडिझेलच्या तीन टँकरसह दोन कोटींचा मुद्देमाल नंदुरबार एल.सी.बी.कडून जप्त

**नंदुरबार, दि.१० (प्रतिनिधी)- गुजरात राज्यात कुठून तरी बायोडिझेल भरुन टँकरने वाहतुक करीत काळाबाजारात विक्रीसाठी घेवून जाण्यात येत होते. नंदुरबार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने विसरवाडीजवळील धुळे-सुरत महामार्गावर बायोडिझेल वाहतुक करणारे तीन टँकर पकडले. त्यातून सुमारे १कोटी २ लाख ४० हजार रुपये किंमतीचे १ लाख २८ हजार लिटर बायोडिझेल मिळून आल्याने तीन टँकरसह सुमारे २ कोटी १७लाख ७० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी तिन्ही टँकर चालकाविरुध्द विसरवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**


नवापूर तालुक्यातील विसरवाडी हद्दीतून धुळे-सुरत महामार्गाने टँकरद्वारे बायोडिझेलची वाहतुक करण्यात येत होती. नंदुरबार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून विसरवाडीजवळील महामार्ग पोलीस मदत केंद्राच्या नजीक तीन टँकर पकडले. या टँकरची तपासणी केली असता त्यात वाहनांमध्ये वापरण्यायोग्य नसलेले बायोडिझेल वाहतुक होत असल्याचे आढळून आले. यावेळी बाबुलाल नरसिंगराम बिष्णोई यांच्याकडील टँकर (क्र.जी.जे.१२ बीडब्ल्यू ७८२९), गुमानराम रुपाराम जाट याच्याकडील टँकर (क्र. जी.जे.१२ बीडब्ल्यू. ४९४७), संतोष राधेश्याम सिंग याच्याकडील टँकर क्र. जीजे. १२/सीटी-९५३७ ताब्यात घेण्यात आले. या पहिल्या टँकरमधून २९ लाख ६० हजाराचे ३७हजार लिटर बायोडिझेल व ३० लाखाचे वाहन, १०हजाराचा मोबाईलसह ५९ लाख ७० हजाराचा मुद्देमाल, दुसऱ्या टँकरमधून ३८ लाख ४० हजार रुपये किंमतीचे ४८ हजार लिटर बायोडिझेल व ५०लाखाचे वाहनासह १० हजाराचा मोबाईल असा ८८ लाख ५० हजाराचा मुद्देमाल आणि तिसऱ्या टँकरमधून ३४ लाख ४०हजार रुपयांचे ४३ हजार लिटर बायोडिझेल, ३५ लाखाचे वाहन व १० हजाराचा मोबाईल असा ६९ लाख ४० हजाराचा मुद्देमाल (पान ४ वर)

### आश्रमशाळेत सर्पदंशाने तीन विद्यार्थिनींचा मृत्यू

गडचिरोली, दि. १० : गडचिरोली जिल्ह्यात धानोरा तालुक्यातील जपतलाई येथील निवासी आश्रमशाळेत झोपेत असताना सर्पदंश झाल्याने तीन विद्यार्थिनींचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जपतलाई येथील या निवासी आश्रमशाळेत नेहमीप्रमाणे रात्री सर्व विद्यार्थिनी जेवण करून आपल्या खोलीत झोपल्या होत्या. रात्रीच्या गाढ झोपेत असताना विषारी सापाने खोलीत घुसून तीन विद्यार्थिनींना दंश केला. रात्री उशिराने सर्पदंशाची बाब आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांच्या आणि इतर मुलींच्या लक्षात आली. कर्मचाऱ्यांनी तातडीने या विद्यार्थिनींना उपचारासाठी धानोरा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मृत विद्यार्थिनींमध्ये दीपिका लकडा (इयत्ता सहावी), सुष्मिता मंडल (इयत्ता आठवी) आणि अनु कोरेटी (इयत्ता दुसरी) यांचा समावेश आहे. (पान ४ वर)

## श्री गजानन महाराज मंदिरतर्फे धुळे-शेगाव पायी वारीस प्रारंभ; भाविकांचा सहभाग

**धुळे, दि.१०- धुळे-शेगाव पायदळ वारीस सुरुवात संस्थेचे अध्यक्ष गोपाळ केले व त्यांची सुविद्य पत्नी सूनंदा केले यांच्या हस्ते आरती होऊन पालखी मार्गस्त झाली. सुरुवातीला महाराजांची भक्तीगीताच्या सुमधुर आवाज, तुळशी घेतलेले भगिनींवर्ग, भागवत धर्माची पताका खांद्यावर घेतलेले भाविक, त्यानंतर टाळधारी बंधू भगिनी साधारण ४०० भाविकांनी सहभाग नोंदवला. दुपारची आरती प्रसाद बाळापूर फागणे येथे पवन पोद्दार यांच्या हस्ते झाली. दुपारी ३ वाजता पायीवारी पुढील मुक्कामास जाण्यासाठी निघाली.**





शेगावच्या गजानन महाराजांची पालखी शेगावहून आषाढी एकादशीला पंढरपूरला पोहचते तेथून परत शेगावला येत असताना नागपंचमीच्या दिवशी ही पालखी खामगाव येथे असते, धुळे शहरातून मंदिरातर्फे पायदळ वारी नागपंचमीच्या आदल्या दिवशी खामगाव येथे पोहोचते, नागपंचमीच्या दिवशी शेगावची पालखी व धुळ्याची पालखी यांची भेट होऊन आपल्या पालखी तील विनेकारींचा सत्कार शाल श्रीफळ देऊन केला जातो आपणही त्यांच्या विनेकरांचा सत्कार करतो, धुळे येथून जाणारी पालखी शेगावला पुढे निघते व शेगावची पालखी मुक्काम करून दुसऱ्या दिवशी खामगावाची ग्रामपरिक्रमा करून शेगावला पोहोचते. शेगाव येथे मंदिरात पोहोचल्यानंतर शेगावच्या मंदिर संस्थानातर्फे पायदळवारी करणाऱ्या सर्वांना महाप्रसाद दिला जातो.

आजचा मुक्काम ९/८/२०२६ चा मुक्काम गुरूमाऊली आश्रम मुकटी (योगीराज सैंदाणे) पायदळ वारीचे प्रमुख संस्थेचे उपाध्यक्ष कमलाकर जोशी, पायदळ वारीचे व्यवस्थापक संस्थेचे सहसचिव तुळशीराम बोरसे आहेत .पायदळ वारीचे संपर्क प्रमुख म्हणून जितेश जोशी, सुनिल पाटील हे आहेत

या पायदळ वारीच्या यशस्वीतेसाठी प्रदीप लाड, प्रकाश बोरवाल, पवन पोद्दार, योगिराज सैंदाणे, परेश सैंदाणे, भाईदास सौंदाणे, (पान ४ वर)

## उड्डाणपुलाच्या कामात निष्काळजीपणा गावाची पाणीपुरवठा पाईपलाईन तोडली

**सोनगीर दि.१० (प्रतिनिधी)- मुंबई-आग्रा महामार्गावरील वाघाडी फाटा येथे सुरू असलेल्या उड्डाणपुलाच्या कामादरम्यान ठेकेदार कंपनीच्या निष्काळजीपणामुळे गावाचा मुख्य पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन वारंवार तोडली जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी सोनगीर ग्रामपंचायतीने आक्रमक भूमिका घेत सिरत कन्ट्रक्शन कंपनीच्या व्यवस्थापक व प्रकल्प संचालकांविरुद्ध शासकीय मालमत्तेचे नुकसान आणि कर्मचाऱ्यांना धमकावल्याप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, वाघाडी (पान ४ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,38,350 रु.+3% GST
सोने- 24 K -1,51,000 रु.+3% GST
चांदी- 2,37,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

### पुरमेपाडा येथील मंदिरातून दोन लाखांचा ऐवज लंपास

धुळे, दि.१०- पुरमेपाडा (ता. धुळे) शिवारातील महामार्ग लगत मंदिरातून चोरट्यांनी दोन लाखांचा ऐवज लंपास केला. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.पुरमेपाडा शिवारात राष्ट्रीय महामार्ग तीन लगत श्री दत्तसाई नागेश्वर तिर्थक्षेत्र येथील साईबाबा मंदिर आहे. रविवारी दुपारी साडेबारा नंतर मंदिरात चोरी झाली. ते वयोगटातील चार तरुणांनी मंदिराचा कडी कोयंडा तोडून आत प्रवेश केला. मंदिरातील तीन किलोचे चांदीचे छत्र, सात किलोचे चांदीचे सिंहासन, मंदीरातील दानपेटी असा एकुण दोन लाख एक हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला.

## गोल्डी चौकात डॉ.आंबेडकरांचा पुर्णाकृती पुतळा उभा करा : कार्यकर्त्यांची मागणी




**साक्री, दि.१० (प्रतिनिधी) - साक्री तालुका डॉ.बाबासाहेब आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते आणि ज्येष्ठ नागरिक यांनी सन १९९५/९६ यावर्षी त्या वेळेच्या साक्री ग्रामपंचायतीने गोल्डी चौक साक्री धुळे मार्गालगत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णकृती पुतळा बसवण्याची मागणी केली होती.मात्र साक्री ग्रामपंचायतीचे रूपांतर नगरपंचायतमध्ये झाल्याने त्या वेळेचा ठराव गहाळ झाल्याचे सांगत पूर्णाकृती पुतळा समर्थन कार्यकर्ते आणि तरुणांनी असंतोष व्यक्त करत साक्री तहसील कार्यालय** (पान ४ वर)

हार्दीक अभिनंदन



डॉ.श्रृती सोनल सुनिल अग्रवाल

प्रवरानगर लोणी येथील प्रवरा इनस्टीट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस (PIMS DU) मधुन मास्टर्स इन ऑर्थास्पोर्टस् फिजीओथेरपी डॉ.श्रृती सोनल सुनिल अग्रवाल यांच्या घवघवीत यशाबद्दल हार्दिक अभिनंदन व भावी वाटचालीस अनंत अनंत शुभेच्छा....

-: शुभेच्छूक :-

जय बाबारी भक्ती मंडळ, धुळे

आपला महाराष्ट्र

# खाण्यायोग्य पिकांच्या शेतीचे वास्तव

आपल्या देशात आणि परिसरात शेती सध्या बऱ्यापैकी विकसित झालेली दिसते.मात्र तिचे व्यापारीकरण करण्यात अनेकांचा पुढाकार आहे.अधिक पिके अधिक पैसा असे हे सूत्र असून या पळापळीत लहान शेतकरी फारसे काही करू शकत नाही.त्याच्या समोर खाण्यासाठी म्हणून पिकविण्या इतकी जमीन आवश्यक असते.जर बाजारपेठेला बाजूला ठेवून शेती ही केवळ उदरनिर्वाहाचे साधन बनली, तर काय होईल सध्याची आपली उत्पादनपद्धती मानवी अस्तित्व टिकवून ठेवण्यास सक्षम ठरेल का ? आरोग्यवर्धक पद्धतीने आपली भूक भागवण्यासाठी आपल्याला कोणते बदल करावे लागतील ? आजही भारतातील सर्वांत महत्त्वाचे उपजीविकेचे साधन म्हणजे शेती होय. भारतात लहान आणि मध्यम शेतकऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. त्यामुळे त्यांच्यासाठी समाधानकारक आणि टिकाऊ उपजीविकेचा मार्ग शोधणे आवश्यक आहे. त्याचबरोबर संपूर्ण देशासाठी पुरेसे आणि आरोग्यास अनुकूल अन्नधान्य निर्माण करणेही गरजेचे आहे.आणि हे उत्पादन टिकाऊ पद्धतीने झाले पाहिजे. ही दोन्ही महत्त्वाची उद्दिष्टे एकाच वेळी साध्य करण्यासाठी अनुकूल कृषी धोरणांची नितांत गरज आहे. अशा धोरणांच्या आधारावर देशभर विविध ठिकाणी चांगली उदाहरणे उभी करता येतील आणि त्यातून उत्साहवर्धक वातावरणात व्यापक चळवळही उभी राहू शकते. शेतीचाआधार पर्यावरण संरक्षणावर असला पाहिजे. रासायनिक खते, रासायनिक कीटकनाशके आणि तणनाशकांचा अतिवापर, तसेच अनेकदा त्यांचे धोकादायक मिश्रण करून केलेला वापर, यामुळे पर्यावरणाची आणि मानवी आरोग्याची मोठी हानी झाली आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांचा उत्पादनखर्चही झपाट्याने वाढला आहे. भविष्यात या साधनांवरील आपले अवलंबित्व सातत्याने कमी करणे आवश्यक आहे.यासाठी नैसर्गिक शेतीचा विकास वैज्ञानिक पद्धतीने रुजवणे गरजेचे आहे.

ग्रामीण पर्यावरणाचे संरक्षण कसे करता येईल, याचा शास्त्रीय पद्धतीने विकास झाला पाहिजे. एखादा शेतकरी एकदा रासायनिक खते आणि कीटकनाशकांवर अवलंबून झाला की त्याला नैसर्गिक शेतीकडे वळण्यासाठी काही काळ आणि मदतीची गरज असते. त्यामुळे अनुकूल धोरणे स्वीकारून त्याला या संक्रमण काळात मदत करणे आवश्यक आहे.याच पहिल्या गरजेशी जोडलेली दुसरी मोठी गरज म्हणजे शेतकऱ्यांचा उत्पादनखर्च कमी करणे. सतत वाढत जाणाऱ्या विविध खर्चांमुळे शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार केला तर रासायनिक खते, कीटकनाशके आणि तणनाशकांवरील खर्च मोठ्या प्रमाणात कमी करता येतो. अनेक शेतकऱ्यांनी अनुकूल आणि व्यवहार्य पद्धती स्वीकारून हा खर्च जवळजवळ पूर्णपणे बंदही केला आहे.अनेक लहान शेतकऱ्यांनी महागडे ट्रॅक्टर न वापरता पॉवर टिलरचा स्वीकार केला आहे. सौरऊर्जेवर आधारित सिंचनाचा वापर करून अनेक शेतकऱ्यांनी डिझेलचा खर्चही मोठ्या प्रमाणात कमी केला आहे. अशा प्रकारच्या विविध खर्चकपातीच्या उपाययोजना स्वीकारल्या पाहिजेत. मात्र या उपाययोजना राबवण्यापूर्वीच जे शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत, त्यांना कर्जमाफी किंवा किमान अत्यल्प व्याजदराने दिलासा देण्यासाठी उपाययोजना पुढे आल्या पाहिजेत.

तिसरी मोठी गरज म्हणजे जलसंधारण आणि मृदासंवर्धनाची कामे अधिक प्रभावीपणे पुढे नेणे. अनेक गावांमध्ये केवळ काही बंधारे बांधल्याने किंवा पूर्वी झालेल्या अशाच कामांची दुरुस्ती केल्याने, तीही अत्यल्प खर्चात, झाल्याने शेतकऱ्यांना मोठा फायदा झाला आहे. काही गावांमध्ये तर लोकांच्या सहभागातून ग्रामीण हितासाठी अशा कामांवर केवळ दहा लाख रुपयांपर्यंतचा योग्य प्रकारे खर्च केल्यास परिस्थितीत किती मोठी सुधारणा होऊ शकते, हे प्रत्यक्ष दिसले आहे.

पावसाचे पाणी वाहून जाणाऱ्या नाल्यांमध्ये छोटी तळी, खड्डे किंवा पाणीसाठे तयार करून मोठ्या प्रमाणात पाणी अडवता येते. त्यामुळे शेतकऱ्यांना तसेच तहानलेल्या पशुधनाला पावसानंतर अनेक महिने पाणी उपलब्ध राहू शकते.सुपीक माती ही देशाची सर्वांत मोठी संपत्ती आहे. त्यामुळे नैसर्गिक शेतीचा स्वीकार करून आणि जलसंधारणाच्या माध्यमातून मातीची गुणवत्ता सुधारली पाहिजे. शेतांचे योग्य प्रकारे बांधबंदिस्तीकरण करून, हिरवाई वाढवून आणि झाडे लावून आपण मातीची धूप रोखू शकतो. त्याचबरोबर जमिनीचे योग्य सपाटीकरण केल्यास शेतीलाही मोठी मदत होते. मिश्रित शेतीचे महत्त्वही सातत्याने स्पष्ट होत आहे, विशेषतः हवामानबदलाच्या काळात. एखाद्या शेतकऱ्याने केवळ एक–दोन पिके घेतली असतील, तर हवामानात थोडासा जरी बदल झाला तरी त्याचे मोठे नुकसान होऊ शकते. याउलट मिश्रित शेतीमध्ये एका पिकातून नुकसान झाले तरी दुसऱ्या पिकातून उत्पन्न मिळण्याची आणि जीवनावश्यक गरजा भागवण्याची शक्यता कायम राहते.

केवळ दोन एकर जमीन असलेला छोटा शेतकरी देखील अनुकूल परिस्थिती मिळाल्यास भरडधान्ये, कडधान्ये आणि तेलबिया यांच्यासोबत छोट्या बागेत भाज्या, फळे, काही मसाले आणि फुलांची लागवड करू शकतो.

अनेक गावांमध्ये दोन किंवा तीन एकर जमिनीवर नैसर्गिक शेतीच्या माध्यमातून प्रकारची विविध खाद्यपिके घेणारे शेतकरी आहेत. यासोबत पशुपालनही असते आणि त्यातून नैसर्गिक शेतीसाठी आवश्यक सेंद्रिय खत मिळते. गाय, बैल, म्हैस आणि शेळी या प्रत्येक पशूचे शेतकऱ्याच्या मिश्र अर्थव्यवस्थेत स्वतंत्र महत्त्व आहे.शेतकऱ्यांबाबत न्याय्य धोरणे स्वीकारणे अत्यंत आवश्यक आहे. विशेषतः जे शेतकरी नैसर्गिक शेतीच्या माध्यमातून आरोग्यास अनुकूल अन्नाचे उत्पादन करतात, त्यांच्या उत्पादनाला योग्य आणि न्याय्य भाव मिळेल, अशी व्यवस्था सरकारने केली पाहिजे.नैसर्गिक शेती, जलसंधारण आणि मृदासंवर्धनासाठीचा अर्थसंकल्प वाढवला पाहिजे. शेतकरी गटांची निर्मिती झाली पाहिजे आणि त्यांच्या स्वतंत्र प्रयत्नांना अधिक महत्त्व दिले पाहिजे. शेतकऱ्यांना कर्ज आणि व्याजाच्या बोजातून दिलासा मिळाला पाहिजे. त्यांना आत्मनिर्भरतेच्या मार्गावर विकासाच्या अधिक चांगल्या संधी मिळाल्या पाहिजेत.

गावकऱ्यांच्या सामूहिक मालकीच्या माध्यमातून अन्नप्रक्रिया उद्योगांचे अधिकाधिक गावांमध्येच प्रकल्प उभे राहिले पाहिजेत. त्यामुळे शेतमालावर गावातच प्रक्रिया होईल, त्याची मूल्यवृद्धी होईल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक बळ मिळेल.अशा प्रकारे शेतीकडे केवळ बाजारासाठी उत्पादन करणारे क्षेत्र म्हणून न पाहता, शेतकरी, पर्यावरण, आरोग्य आणि स्थानिक अर्थव्यवस्था यांना एकत्र जोडणारी जीवनपद्धती म्हणून पाहण्याची गरज आहे.मात्र यातील एकाही विषयाच्या संदर्भात धोरणकर्ते विचार करायला तयार नाहीत. मुळात त्यांचा अभ्यासच नाही. ज्यांचा आहे ते मार्केट ओरिएंटेड शेती कशी होईल याचाच विचार करताना दिसतात. त्यामुळे अधिक उत्पादन अधिक पिके आणि अधिक पैसा असे नवे समीकरण शेतीमध्ये तयार झाले आहे. दुसरीकडे वाढत्या शहरीकरणात पिकावू शेती बिनशेतीत परिवर्तित केली जात आहे. शेतीत कष्ट करून ती पिकविणे आणि त्यातून पैसा निर्माण करणे हे जिकिरीचे काम आहे. त्यापेक्षा बिनशेती करून प्लॉट तयार करणे आणि त्यात विकासकांना निमंत्रित करणे सोपे आहे. भरपूर आणि सहज पैसाही मिळतो. परंतु शेती कमी होत आहे याचा विचार कोणाच्याच डोक्यात नाही

परिणामी खाण्यायोग्य पिकांची शेती आणखी जटील झाली आहे. वाढती लोकसंख्या आणि कमी कमी होणारी शेती असे दुहेरी संकट पुढच्या काळात वाढत जाणार आहे. कृषी तज्ञांना याबाबत कल्पना आहे निदान त्यांनी तरी धोरणकर्त्यांना समजावून सांगण्याची गरज आहे.



## नंदुरबार शिवशक्ती वाहतूक सेनेच्या जि.मीडिया प्रमुखपदी सुमित गिरासे

शहादा, दि.१०(प्रतिनिधी)- शिवसेना प्रणित शिवशक्ती वाहतूक सेनेच्या नंदुरबार जिल्हा मीडिया प्रमुख पदावर सुमित युवराज गिरासे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेनेचे प्रमुख व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आशीर्वादाने तसेच राष्ट्रीय अध्यक्ष अली भाई, राष्ट्रीय उपाध्यक्ष अशरफ शहा यांच्या आदेशानुसार नंदुरबार जिल्ह्यातील संघटनात्मक जबाबदारी सुमित युवराज गिरासे यांच्यावर टाकण्यात आली आहे. या नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे की, वाहतूकदार व कामगारांच्या हितासाठी सातत्याने कार्य करावे. वाहतूकदारांच्या समस्या, त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आवाज उठविणे तसेच संघटनेची ध्येय-धोरणे तळागाळापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी पार पाडण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच शिवशक्ती वाहतूक सेनेच्या माध्यमातून वाहतूकदार व कामगारांच्या प्रश्नांसाठी प्रभावीपणे काम करण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सुमित गिरासे यांची नियुक्ती एक वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात आली असून त्यांच्या कार्याचा आढावा घेऊन पुढील मुदतीबाबत निर्णय घेतला जाणार असल्याचे पत्रात नमूद आहे.

त्यांच्या या नियुक्तीबद्दल शिवसेना प्रणित शिवशक्ति वाहतुक सेना व शिवशक्ति कामगार सेनेचे उत्तर महाराष्ट्राचे उपाध्यक्ष कैलास बारकु पावरा (पिंगाणे) तसेच विविध संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## बारामतीत धावपट्टीवर पुन्हा विमान अपघात

बारामती, दि. ९ : बारामती विमानतळावर रविवारी प्रशिक्षण विमानाचा अपघात झाल्याची घटना घडली. कार्व्हर एव्हिएशन या संस्थेचे प्रशिक्षण विमान धावपट्टीवर टॅक्सिंग करत असताना ही दुर्घटना घडल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस तसेच प्रशासकीय अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून, दुर्घटनेची पाहणी आणि पुढील कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

विमानाच्या अपघातामागे नेमके कोणते कारण होते, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. तांत्रिक बिघाडामुळे ही दुर्घटना घडली की अन्य कोणते कारण होते, याचा तपास केला जात आहे. विमानात त्या वेळी नेमके किती जण होते आणि त्यांची सद्यस्थिती काय आहे, याबाबतही अधिकृत माहिती उपलब्ध झालेली नाही. दरम्यान, दुर्घटनेनंतर घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रसारित झाला आहे.

## स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्र सेवा दलातर्फे ध्वजारोहण

**धुळे, दि.१०- राष्ट्र सेवा दल, धुळे महानगर यांच्या वतीने स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला विशेष ध्वजारोहण व ध्वजवंदन कार्यक्रमाचे आयोजन दि. १४ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री १० वाजता महाराणा प्रताप चौक, जुन्या महानगरपालिकेसमोर, धुळे येथे होणार आहे.**

कार्यक्रमास राष्ट्र सेवा दलाचे जेष्ठ साथी शरद कांबळे तसेच ज्येष्ठ सेवा दल साथी एस.आर. वाणी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. रात्री १० वाजता कार्यक्रमास सुरुवात होऊन मध्यरात्री १२ वाजता मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण व ध्वजवंदन करण्यात येणार आहे.

राष्ट्रवाद, लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता आणि विज्ञाननिष्ठा या मूल्यांचा जागर करणाऱ्या या कार्यक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन राष्ट्र सेवा दलाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

कार्यक्रमासाठी जिल्हाध्यक्ष कैलास चव्हाण, अनिल देवपूरकर, ॲड. साजेदा शेख, महेश बोरसे, रामदास जगताप, सुरेखा रमेश सावंत, भैय्या पाटील,निता वैद्य प्रयत्नशील आहेत.

## श्रीकृष्ण माध्य.विद्या.त सीडबॉल उपक्रम संपन्न

शहादा, दि.१०(प्रतिनिधी)- तालुक्यातील फेस येथील श्रीकृष्ण माध्यमिक विद्यालयात इको क्लब व हरित सेनेअंतर्गत सीडबॉल उपक्रम उत्साहात राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत इको क्लबचे शिक्षक खगेन्द्र कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध प्रजातींच्या बिया गोळा करून त्यापासून सीडबॉल तयार केले. तयार करण्यात आलेले सीडबॉल शालेय परिसर तसेच गावातील मुख्य रस्त्यांच्या परिसरात वितरित करण्यात आले. त्याचबरोबर विविध ठिकाणी वृक्षारोपणही करण्यात आले.



## मुकेशभाई आर.पटेल सैनिकी शाळेत लिपन आर्ट स्पर्धा उत्साहात संपन्न

**शिरपूर, दि.१० (प्रतिनिधी)- मुकेशभाई आर. पटेल मुला-मुलांची सैनिकी शाळा, तांडे ता. शिरपूर येथे शनिवार उपक्रमांतर्गत दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी लिपन आर्ट स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाली.**

प्राचार्य दिनेशकुमार राणा यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे उत्कृष्ट प्रदर्शन घडवले. क्रिटिव्हिटी इन क्ले ट्रॅडिशन या संकल्पनेवर आधारित ही स्पर्धा इयत्तानिहाय आणि हाऊसनिहाय (गृहनिहाय) घेण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन दीपश्री गोसावी गिरी यांनी केले. स्पर्धेचे परीक्षण वेरोनिका फर्नांडिस व स्नेहा बुरसे यांनी केले. शाळेतील रुद्र हाऊस, भीष्मा हाऊस, ब्रह्मोस हाऊस आणि विक्रांत हाऊस या चारही गृहांच्या अंतर्गत ही स्पर्धा झाली.

स्पर्धेचे निकाल (विजेते हाऊस) : इयत्ता सहावी रुद्र हाऊस विजेता, इयत्ता सातवी ब्रह्मोस हाऊस विजेता, इयत्ता आठवी भीष्मा हाऊस विजेता, इयत्ता नववी भीष्मा हाऊस विजेता

तसेच उत्कृष्ट कलागुणांसाठी विशेष पुरस्कार रुद्र हाऊसची विद्यार्थिनी चैताली पाटील, ओमकार त्रिवेदी आणि नितान अंबडे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

### जाहीर नोटीस

नि.६

**शिरपूर येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो. कनिष्ठ स्तर, यांचे न्यायालयात.**

दि. कि. अर्ज नं. ६७९/२०२६

१) अरुणाबाई तुकारामसिंग राजपूत, २) लालसिंग तुकाराम राजपूत
३) विजय तुकारामसिंग राजपूत,
अ. नं. ३ प्लॉट नं. २६ भास्कर बापू कॉलनी शिरपूर जि. धुळे.
४) सखुबाई दर्यावसिंग राजपूत,
रा. २० भिमा बिल्डींग शरदचंद्र नगर, करवंद नाका ता. शिरपूर जि. धुळे
५) सुवर्णा देवीसिंग गिरासे, रा.भवाळे ता. चोपडा, जि.जळगांव .. अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही .... जाबदेणार

x

तुकारामसिंग बहादूरसिंग राजपूत मृत्यू दिनांक ०२/०५/२०२६
प्लॉट नं. २६ भास्कर बापू कॉलनी शिरपूर जि. धुळे. ...मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे. शिरपूर न्यायालयात मयत तुकारामसिंग बहादूरसिंग राजपूतहे दि. ०२/०५/२०२६ रोजी शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काही एक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास त्यांनी दिनांक / /२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फतहजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात.त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व कुणाचीही काही एक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक २८/८/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

दि. ३०/७/२०२६ आदेशावरुन
सही... सही...
कनिष्ठ लिपिक (कोर्टाचा शिक्का) सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय, शिरपूर दिवाणी न्यायालय, शिरपूर

### जाहीर नोटीस

नि.७

**शिरपूर येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो. कनिष्ठ स्तर, यांचे न्यायालयात.**

दि. कि. अर्ज नं. ६८६/२०२६

१) रंजनाबाई कोमलसिंग गिरासे, रा. पळासनेर ता. शिरपूर जि. धुळे
२) प्रसन्न कोमलसिंग गिरासे, रा.पळासनेर ता. शिरपूर जि. धुळे
ह. मु. ए.०१, श्री गजानन रेसिडेन्सी, गजानन महाराज कॉलनी,
गजानन महाराज मंदिर जवळ, प्रशांत नगर, नाशिक
३) भारती छत्रपाल जमादार, सावळदे ता. शहादा जि. नंदुरबार
४) देविका हेमंतसिंग जाधव, रा.देवपूर धुळे ता. जि.धुळे.
५) रेणुकाबाई प्रदिप राजपूत,
रा. ४२ब, बालाजी नगर, शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे... .. अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही .... जाबदेणार

x

कोमलसिंग पदमसिंग गिरासे मृत्यू दिनांक १५/१२/२०२४
रा.पळासनेर ता. शिरपूर जि. धुळे ...मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे. शिरपूर न्यायालयात मयत कोमलसिंग पदमसिंग गिरासे हे दि. १५/१२/२०२४ रोजी शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काही एक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास त्यांनी दिनांक २७/८/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात.त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व कुणाचीही काही एक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक ३०/७/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

आदेशावरुन
सही... सही...
कनिष्ठ लिपिक (कोर्टाचा शिक्का) सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय, शिरपूर दिवाणी न्यायालय, शिरपूर

### जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो., ज्युनी.डिव्ही.यांचे कोर्टात**

दिवाणी कि.अर्ज नं.७३६/२०२६, नि.६,

नाना दतू भिल वगैरे ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ....जाबदेणार

ज्या अर्थी अर्जदार न.१ ते ५ हे मयत कै राजीबाई उर्फे राजसबाई नाना भिल यांचे कायदेशीर वारस असून मयत मयत कै राजीबाई उर्फे राजसबाई नाना भिल यांचा दि.१५/०४/२०२६ रोजी उंटावद ता शिरपूर येथे मृत्यू झाला आहे अर्जदार मयत हे मुळचे उंटावद ता शिरपूर जिल्हा धुळे येथील राहणारे होते व आहेत मयताचे अर्जदार हे अनुक्रमे पती व मूले असे वारस आहेत म्हणून अर्जदार यांनामयत कै राजीबाई उर्फे राजसबाई नाना भिल यांचे यांचे वारस असून अर्जदार यांना वारस दाखल्याची आवश्यकता असलेने अर्जदार यांने बॉम्बे रेगुलेशान कायदा १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी/वारसांचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज केला आहे.

त्या अर्थी या नोटीसीने तमाम जनतेस कळविणेत येते कि तमाम जनते पैकी वरील मयताचे या अर्जदार यांचे व्येतिरिक्त जे कोणी वारस असतील त्यांनी या मे.न्यायालयात हि नोटीस प्रसिद्ध झाले पासून ३० दिवसांचे आत अगर दिनाक ९/९/२०२६ रोजी ठीक सकाळी १०.३० वा स्वत अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फतहजर राहून लेखी स्वरुपात हरकती सादर करावे अन्यथा सदरील अर्जदार यांचा तोंडी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदार यांचे व्यतिरिक्त दुसरे कोणीच मयताचे वारस नाहीत असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाण पत्र अर्जदार यांस मागणी प्रमाणे देण्यात येईल त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही मे.न्यायाधीश सो कनिष्ट स्तर शिरपूर जिल्हा धुळे यांचे आदेशावरून सदरची नोटीस प्रसिद्धीस दिली असे.

आज रोजी माझ्या साहिनी व कोर्टाचे शिक्कायानिशी प्रसिदधीस दिली असे.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक (शिक्का) सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, शिरपूर दिवाणी न्यायालय, शिरपूर

### जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो., ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

दि.कि.अर्ज नं.६७७/२०२६, नि.६,

१) मीनाबाई देवाजी फुलपगारे, २) सीमाबाई विजय भिल,
३) अर्जुन नामदेव भिल (मयत), ३)अ) संगीताबाई अर्जुन भील,
३)ब) जागृती अर्जुन भिल, ३)क) अश्विनी अर्जुन भिल ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ....जाबदेणार

ज्याअर्थी मयत कै.नामदेव देवाजी फुलपगारे (भिल) हे मौजे विखरण बु ता.शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेगयुलेशन अधिनियम १८२७, कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि.२८/८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून, हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल. दि.३०/७/२०२६

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक (शिक्का) सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे

## गोताणे विकासो अध्य.पदी सरला पाटील व्हा.चेअरमनपदी जगन्नाथ पाटलांची निवड

धुळे, दि.१०- धुळे तालुक्यातील गोताणे येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी सरला अर्जुन पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तर व्हा. चेअरमन म्हणून जगन्नाथ भुरमल पाटील यांची निवड झाली आहे. नुकतीच गोताणे येथे विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या संचालक मंडळाची बैठक घेण्यात आली.

या बैठकीत सरला अर्जुन पाटील यांचा चेअरमन पदासाठी तर व्हा. चेअरमन पदासाठी जगन्नाथ भुरमल पाटील यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची यावेळी सर्व संमतीने बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी पॅनल प्रमुख बाजार समितीचे माजी संचालक स्व.अर्जुन भाया पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. नवनियुक्त चेअरमन, व्हा.चेअरमन यांचा शेतकरी व सभासद तसेच ग्रामस्थांच्यावतीने सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्री अमोल यंडाईत, सचिव तुकाराम महाले यांनी काम पाहिले. याप्रसंगी सेवा सोसायटीचे संचालक धुडकू कथू पाटील, केवळबाई हिरालाल पाटील, शिवाजी भटू पाटील, ज्येष्ठ नेते पांडुरंग विठ्ठल पाटील, हिम्मत जिभाऊ पाटील, आनंदा रामभाऊ पाटील, महारु पुंजाराम पाटील, बारकू भाऊराव पाटील, भटू अर्जुन पाटील, भास्कर भुरमल पाटील, धनराज हिरालाल पाटील, संतोष प्रकाश पाटील, नितीन कारभारी पाटील उपस्थित होते.

### प्रकाश में आज जय हो




सलमान खान तब्बू डेनी समखान झेझी शाह सुनिल शेट्टी अदित्यपांचोली मुकुल देव नादिरा बब्बर

### शब्दकोडे क्रमांक : २४३०

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ■ | ४ | ५ | ६ | | ७ | ■ | ८ |
| ९ | | | ■ | १० | | | | ■ | ११ | | |
| १२ | | ■ | १३ | | | ■ | १४ | १५ | | ■ | |
| | ■ | १६ | | | ■ | १७ | | | ■ | १८ | |
| ■ | १९ | | ■ | २० | | ■ | | ■ | २१ | | ■ |
| २२ | ■ | २३ | २४ | | ■ | २५ | ■ | २६ | | ■ | २७ |
| ■ | २८ | | | ■ | २९ | | | ■ | ३० | ३१ | |
| ३२ | | ■ | ३३ | ३४ | | | ■ | ३५ | ■ | | ■ |
| ■ | ३६ | | ■ | | | ■ | ३८ | | ३९ | ■ | ४० |
| ४१ | | ■ | ४२ | | ■ | ४३ | | ■ | ४४ | | |
| | ■ | ४५ | | ■ | ४६ | | ■ | ४७ | | ■ | |
| ४८ | | ■ | ४९ | | ■ | ५० | | | ■ | ५१ | |

**आडवे शब्द :** १.वर्षा ऋतू ४.सदैव ९.सान १०.एक लोकप्रतिनिधी पद ११.वोट देणारा १२.धान्यच बारीक अंश १३.सदरा १४.कागदाच्या डाव्या बाजूस असलेला रकाना १६.इंग्रजीत-आरसा १७.वसा चालवणारा १८.वेळ १९.आमिर खान,ट्विंकल खन्ना आणि फैझल खान यांचा एक सिनेमा २०.विशेष २१.एक लहान आकाराचे फळ २२.इंग्रजी कालगणनेतील पाचवा महिना २३.जड २६.साद २८.एक शेंगभाजी २९.घर ३०.फांदी ३२.नाद ३३.ताकदवान ३६.इंग्रजीत-पैसे ३७.गोट्या खेळताना खोदतात तो लहान खळगा ३८.वसा ४१.अंत ४२.विहिरीचे पाणी काढण्याचे यंत्र वं ३.खरी नसलेली ४४.वजनास जड नसलेला ४५.सोबती ४६.छिद्र ४७.ढीग ४८.१००० किलो ४९.व्यवस्थित ५०.भात शेतीची केलेली रोपणी ५१.हिंदीत-आम्ही **उभे शब्द :** १.मुलांची जबाबदारी २.पायताण ३.मोठा नसलेला ४.सज्जड दम ५.गुंड ६.पातळ ७. स्वित्झर्लंड देशाच्या पूर्वेकडील ग्राउबुंडन कॅन्टोनमध्ये आल्प्स पर्वतरांगांमध्ये वसलेले एक प्रसिद्ध शहर ८.राजस्थानच्या मारवाड प्रांतातील पंथ १०.एक हिंदी सिनेनट १३.हस्त १५.महिना १६.हिंदीत-भेसळ १८.निवास २४.दरारा २५.मुख २७.गोरी नसलेली २७.कैफात आलेला २९.प्रश्न ३१.लोभ ३४.अंगाशी केलेली घसट ३५.पुन्हा-हिंदीत ३८.लहान आकारचा वाडगा ३९.धैर्य ४०.ठेकेदार ४१.कधीही कंटाळा ना आणणारा ४२.संमोहित करणारी ४३.हिंदीतील-खांसी ४७.राजाची पत्नी

### शब्दकोडे क्रमांक : २४२९ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वे | द | ना | शा | म | क | ■ | मो | ल | म | जू | री |
| त | वा | ■ | स | म | ■ | मा | ल | क | ■ | न | ■ |
| न | ■ | मा | न | ■ | फ | र | क | ■ | भू | ■ | भी |
| ■ | रं | ग | ■ | का | ळा | ■ | री | स | ■ | मा | मा |
| खा | क | ■ | मे | ल | ■ | त | ण | ■ | ते | रा | ■ |
| र | ■ | रे | वा | ■ | वा | डा | ■ | सा | ल | ■ | फि |
| ट | न | ■ | ड | ग | र | ■ | व | ध | ■ | टा | की |
| ■ | ट | रे | ■ | म | दा | र | ■ | ना | म | ■ | र |
| आ | स | ■ | बा | ■ | त | ■ | द | ■ | स | डा | ■ |
| स | म्रा | ट | ■ | गा | ■ | हा | ल | चा | ल | ■ | ध |
| ■ | ट | ■ | प | र | ख | ड | ■ | व | त | न | ■ |
| नो | ■ | हो | ■ | वा | त | ■ | व | ट | ■ | ऊ | न |






पान १ वरुन

## विद्यार्थ्यांवर फवाऱ्याचा मारा

ॲम्बुलन्सने धुर्वा गोलचक्कर येथे पोहोचले आणि तेथून विधानसभेच्या दिशेने रवाना झाले. उपोषणाचा सोमवारी नववा दिवस असून, प्रकृती खालावत असल्याचे महतो यांनी सांगितले. मात्र, पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांना होणाऱ्या त्रासाच्या तुलनेत स्वतःचा त्रास काहीच नसल्याचे त्यांनी म्हटले.

आज क्रांतीचा दिवस

विधानसभा घेराव बाबत बोलताना देवेंद्रनाथ महतो यांनी, आज क्रांतीचा दिवस असून, संघर्षाचा हा महत्त्वाचा टप्पा आहे. विद्यार्थ्यांनी शांततापूर्ण मार्गाने विधानसभेकडे मोर्चा काढत असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे रांचीमध्ये पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला असून आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## साखरेनंतर गुळाला महागाईचा तडका

जाणवत असल्याने गुळ उत्पादनात घट झाली आहे. अन्न आणि औषध प्रशासन विभागाने (एफडीए) कारवाई केल्यानंतर गुऱ्हाळे बंद झाली. कारवाई झाल्यानंतर गुळाची आवक कमी झाली होती. जून महिन्यात मार्केट यार्डातील घाऊक भुसार बाजारात दररोज वीस टन गुळाची आवक होत होती. गुळाची आवक आता पुन्हा वाढली आहे. पुणे जिल्ह्यातील दौंड, यवत, केडगाव, तसेच सांगली जिल्ह्यातून गुळाची आवक होत आहे. पुण्यातील बाजारपेठेसह नाशिक, ठाणे, भिवंडी, कल्याण येथील बाजारपेठेतून गुळाला मागणी वाढली आहे. गुजरात, छत्तीसगड, ओडिशा, मध्य प्रदेश या राज्यांतून गुळाला मागणी वाढली आहे, असे त्यांनी नमूद केले. गेल्या काही वर्षांत गुळाचा चहा पिण्याचे प्रमाण वाढले आहे. चहा विक्रेत्याकंडून गुळाला मागणी वाढली आहे.

आता बिगर भेसळीचा गुळ

अन्न आणि औषध प्रशासन विभागाने (एफडीए) गुऱ्हाळांवर कारवाई केली होती. त्यानंतर रंग आणि साखरेची भेसळ न करता गुऱ्हाळात पारंपरिक पद्धतीने गुळ तयार केला जात आहे. बाजारात सध्या शुद्ध गुळाची आवक होत आहे.

## किसान सभेचा रास्ता रोको

बेरोजगारीला आळा घालावा, अशी मागणी करण्यात आली. रेशनवर दरमहा ३५किलो धान्यासह खाद्यतेल, साखर आणि डाळी द्याव्यात, शेतमजुरांना किमान वेतन द्यावे, तसेच संजय गांधी आणि श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजनेंतर्गत तीन हजार रुपये पेन्शन द्यावी, अशीही मागणी करण्यात आली.

अंगणवाडी, आशा कर्मचारी, शालेय पोषण आहार कर्मचारी आणि इतर कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घ्यावे, अशी मागणी आंदोलकांनी केली. याप्रसंगी नायब तहसीलदारांनी आंदोलकांचे निवेदन स्वीकारले. आंदोलनस्थळी पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात होता.

आंदोलनाला नथू साळवे, सबू न्हाये, ममता पाडवी, वनाशीबाई भिल आणि सखुबाई सोनवणे यांच्यासह शेतकरी, कामगार, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिरपुरला मोर्चा काढून जेलभरो आंदोलन




**शिरपूर, दि. १० (का.प्र.)– संयुक्त किसान मोर्चा, अखिल भारतीय खेत मजदूर युनियन व आयटक संघटनेच्या वतीने १० ऑगस्टला शेतकरी, शेतमजूर, आशा व गटप्रवर्तकांचा मोर्चा काढून जेलभरो आंदोलन करण्यात आले. देशव्यापी आवाहनानुसार देशातील व राज्यातील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी तसेच संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या विविध मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले.**

चोपडा जीन येथून मोर्चा मेन रोडमार्गे शिरपूर पोलीस ठाण्यावर पोहोचल्यावर मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. जेलभरो आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य किसान सभा, धुळे जिल्हा; आशा व गटप्रवर्तक संघटना; महाराष्ट्र राज्य लालबावटा शेतमजूर युनियन, धुळे जिल्हा या तीन संघटनांच्या वतीने राष्ट्रपतींच्या नावे विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

किसान सभेच्या मागण्या : भारत–अमेरिका व्यापारमुक्त करार मागे घ्यावा, स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशींनुसार हमीभावाचा कायदा करावा, चार श्रमसंहिता रद्द कराव्यात, वीज विधेयक २०२५ मागे घ्यावे, शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी.

आशा व गटप्रवर्तकांच्या मागण्या : आशा व गटप्रवर्तकांना किमान २६ हजार रुपये मासिक वेतन द्यावे, त्यांना कंत्राटी कर्मचाऱ्यांचा दर्जा द्यावा, निवृत्तीवेतन योजना लागू करावी, दरमहा निश्चित तारखेला वेतन अदा करावे, शासनाने वेळोवेळी जाहीर केलेले मानधन तातडीने द्यावे तसेच अतिरिक्त कामाचा वाढीव मोबदला द्यावा.

शेतमजूर युनियनच्या मागण्या : शेतमजुरांना आर्थिक स्थैर्य मिळण्यासाठी मनरेगा अंतर्गत वर्षाला २०० दिवस काम उपलब्ध करून द्यावे, दैनिक किमान मजुरी ७०० रुपये करण्यात यावी, सर्व भूमिहीन कुटुंबांना हक्काच्या घरासाठीजमीन मंजूर करावी.

याशिवाय, वृद्ध, विधवा व दिव्यांग शेतमजुरांना सामाजिक सुरक्षिततेसाठी दरमहा तीन हजार रुपये निश्चित पेन्शन लागू करावी, रेशन कार्डमधून गरीब कुटुंबांची नावे कमी करण्याचे आदेश मागे घेऊन सर्वांना पुरेसे अन्नधान्य उपलब्ध करून द्यावे, वीज सुधारणा कायदा व प्रीपेड स्मार्ट मीटर योजना रद्द करावी, शेती क्षेत्राला घातक ठरणारा भारत–अमेरिका व्यापारमुक्त करार तातडीने थांबवावा, शिरपूर कॉटेज रुग्णालयात गोरगरीब रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून द्यावी अशा मागण्या किसान सभेचे प्रदेशाध्यक्ष ॲड. हिरालाल परदेशी, धुळे जिल्हा लालबावटा शेतमजूर युनियनचे जिल्हाध्यक्ष ॲड.संतोष पाटील, किसान सभेचे जिल्हाध्यक्ष सतीलाल पावरा, नरसिंग पावरा, भाकपचे शहर सेक्रेटरी जितेंद्र देवरे, शेतमजूर युनियनचे जिल्हा उपाध्यक्ष भरत सोनार, कंवरलाल कोळी, अर्जुन कोळी, ॲड. सचिन थोरात, गुमान पावरा, सुदाम पावरा, तुळशीराम पाटील, तुळशीराम पावरा, आशा संघटनेच्या स्मिता दोरीक, अरुणा देवरे, आशा मैराळे, वैशाली बुवा, स्वाती बडगुजर, छाया चव्हाण, आशा वळवी, लक्ष्मी पावरा, अनुपमा पाटील, कल्पना गवळे, आशाताई वाघ, ललिता राजपूत आदिंनी निवेदनातून केल्या.

## आ.राजेश पाडवींच्या प्रयत्नांना यश

प्रशासकीय कार्यालय, न्यायाधीशांचे चेंबर, बार रूम, अद्ययावत लायब्ररी, प्रशासन कक्ष, मालमत्ता कक्ष, संगणक कक्ष, पत्रकार परिषद कक्ष, उपहारगृह आणि लोक अदालत राहतील.इमारतीमध्ये आवगमनासाठी लिफ्ट आणि जिने, उत्तम अग्निशमन व्यवस्था, आधुनिक विद्युतीकरण आणि उच्च दर्जाचे फर्निचर असणार आहे. तसेच न्यायालय परिसरात पक्क्या स्वरूपाचे अंतर्गत रस्ते तयार करण्यात येणार आहेत.आमदार राजेश पाडवी यांनी केलेल्या या महत्त्वाच्या घोषणेनंतर शहादा येथील वकील वर्गाकडून आनंद व समाधान व्यक्त करत या निर्णयाचे जोरदार स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार शहादा बार असोसिएशनचे सचिव कपिल खर्डे यांनी मानले.

पान १ वरुन

## नंदुरबार एल.सी.बी.कडून जप्त

हे तिन्ही मिळून एकुण २ कोटी १७ लाख ७० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याबाबत पोकॉ. रामेश्वर नामदेव चव्हाण यांनी विसरवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार टँकर चालक बाबुलाल नरसिंगराम बिष्णोई (रा. भुनिया जि. बाडमेर राजस्थान), गुमानराम रुपाराम जाट (रा. दिनगड जि. बाडमेर राजस्थान), राधेश्याम सिंग (रा.पुरा हरलाल जि. आग्रा उत्तरप्रदेश) या तिघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जयेश खलाणे करीत आहेत.

## तीन विद्यार्थिनींचा मृत्यू

आदिवासी दिनाचा कार्यक्रम संपल्यानंतर सर्व विद्यार्थिनी नेहमीप्रमाणे खोलीत झोपल्या होत्या. मध्यरात्रीच्या सुमारास विषारी सापाने खोलीत प्रवेश करून त्यांना दंश केला. त्रास होऊ लागल्याने मुलींनी आरडाओरड केली. त्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वेळेवर योग्य उपचार मिळाले नाहीत. विष शरीरात भिनल्याने तिन्ही मुलींचा मृत्यू झाला. वसतीगृहात पुरेशा खाटा उपलब्ध नसल्याने विद्यार्थिनींना जमिनीवर गाद्या टाकून झोपावे लागत होते. पावसाळ्यात विषारी प्राण्यांचा वावर वाढत असतानाही आश्रमशाळा परिसरात आवश्यक ती स्वच्छता, कीटकनाशकांची फवारणी किंवा इतर सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या नव्हत्या.

पालकांचा आक्रोश

या घटनेची माहिती मिळताच विद्यार्थिनींच्या नातेवाईकांनी गडचिरोली जिल्हा रुग्णालयात धाव घेतली. आपल्या पोटच्या गोळ्यांचा असा अचानक आणि तडफडून मृत्यू झाल्याचे पाहून पालकांनी आणि नातेवाईकांनी रुग्णालयाच्या परिसरात एकच आक्रोश केला. आश्रमशाळेत सर्पदंशाने तीन विद्यार्थिनींचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटनेवर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या घटनेची माहिती मला मिळाली असून यासंदर्भातील अधिकची आणि सविस्तर माहिती मी प्रशासनाकडून मागवली आहे.

## उड्डाणपुलाच्या कामात निष्काळजीपणा

फाट्यावरील जुना पूल पाडून नवीन उड्डाणपुलाच्या पायाचे खोदकाम ब्रेकरद्वारे सुरू आहे. या पुलाखालूनच गोड विहिरीवरून सबर गडावरील पाण्याच्या मोठ्या टाकीत पाणी नेणारी मुख्य पाईपलाईन गेलेली आहे. शनिवारी (दि. ८ ऑगस्ट) दुपारी चारच्या सुमारास सिरत कन्ट्रक्शन कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या खोदकामात ही पाईपलाईन पूर्णपणे फुटली. त्यामुळे ३० ते ३५ हजार लोकसंख्या असलेल्या सोनगीर गावाला होणारा पाणीपुरवठा ठप्प झाला आहे.

सदर कंपनीने यापूर्वीही चार ते पाच वेळा ही पाईपलाईन तोडली असून यामुळे आधीच दोन–तीन दिवसांआड होणारा पाणीपुरवठा अधिकच लांबणीवर पडत आहे. ग्रामपंचायतीने पत्रव्यवहार करूनही ठेकेदाराकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप आहे.

घटनेची माहिती मिळताच पाणीपुरवठा सुपरवायझर राजेंद्र महारू मोरे यांनी घटनास्थळी जाऊन विचारणा केली असता, आमचे कोणीच काही करू शकत नाही, आम्ही पाईपलाईन दुरुस्त करणार नाही, येथून निघून जा अशी दमदाटी ठेकेदाराच्या कर्मचाऱ्यांनी केली. या मुजोर वर्तणुकीनंतर अखेर ग्रामपंचायतीने सोनगीर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली.वरिष्ठ अधिकारी आणि राजकारण्यांचे अभय असल्याने मोठ्या ठेकेदार कंपन्या स्थानिक प्रशासन व नागरिकांना जुमानत नसल्याचे चित्र या घटनेवरून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

## पायी वारीस प्रारंभ

हिरामण पाटील, किशोर वाणी, विवेक कुलकर्णी , संदीप मराठे, चिंतामण पाटील, आत्माराम पाटील, गोपाळ मराठे, गोपाळ पाटील, बापू मराठे, साई गजानन ग्रुप म्हसावद, निवृत्ती पाटील, पी.के. पाटील, काशिनाथ हडप, किरण पाठक, राजेंद्र वाडनेरे, कैलास पाटील, ॲड.अशोक डोलारे, दत्तात्रय पाटील, ईश्वर धुरेकर, विलास पाटील, शांताराम कासार, राजेश कापसे, पराग जोशी, अनंत कुलकर्णी, अनिल खंडेवाल, विशाल किंगे, विकास कारंडे, विनायक पाचपुते, अमर देशमुख, पुरुषोत्तम क्षीरसागर, वसंतजी शर्मा, संजय वाणी, अशोक रेवागडे, शिवकुमार डोंगरे, संजय मधुकर वाणी, रमाकांत मोरे, तेजस गोरख ढेरे, रवींद्र घोगले, ज्ञानेश्वर सोनार, विजय वाणी, देवयानी पाटील, भरत जोशी, सुधीर पाटील, मिलिंद बुधर, शरद वाणी, सूर्यवंशी परिवार, निशिकांत मोरे यांचे आर्थिक सहकार्य व सर्व गजानन भक्तांनी परिश्रम घेतले.

## दर्जेदार आरोग्य सेवा मिळणार

रुग्णालय उभारण्यात आले. क्रांती दिनाच्या दिवशी सायंकाळी पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते या रूग्णालयाचे लोकार्पण झाले. या लोकार्पण सोहळ्यास आ.भदाणे, माजी खा.डॉ. सुभाष भामरे, महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्सना पाटील, माजी आ.कुणाल पाटील, भाजप नेते ओमप्रकाश अग्रवाल, शहर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांच्यासह महापालिका अधिकारी, वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आगामी आरोग्य सुविधांची माहिती देताना मंत्री रावल म्हणाले, अजून चार रुग्णालये उभारण्यात येत आहेत. जिल्हा नियोजन आणि विकास समितीच्या माध्यमातून चार अत्याधुनिक रुग्णालयांची कामे सुरू आहेत. सौ. विमलादेवी अग्रवाल यांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात दिलेले योगदान अतुलनीय होते. त्यांच्या जयंतीदिनी त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ उभारलेल्या रुग्णालयाचे लोकार्पण होणे हा त्यांच्या कार्याचा योग्य सन्मान आहे, असे मंत्री रावल म्हणाले. आ.अनुप अग्रवाल म्हणाले, रुग्णालय उभारण्यात आलेला परिसर हा प्रामुख्याने गरीब वस्तीचा असून, महामार्गालगत रुग्णालय असल्याने परिसरातील नागरिकांसह अपघातग्रस्तांना तातडीने उपचार मिळण्यास मदत होणार आहे. डीपीडीसीच्या माध्यमातून पस्तीस लाख रुपयांच्या निधीतून वातानुकूलित पंचवीस खाटांचे हे रुग्णालय उभारण्यात आले असून ए.बी. फाउंडेशन कडून त्याचे पालकत्व सांभाळले जाणार आहे. शहरातील आरोग्य सुविधांच्या विस्तारासाठी सुमारे पंधरा कोटी रुपयांच्या निधीतून आणखी चार रुग्णालयांची कामे प्रगतीपथावर असल्याचे अग्रवाल यांनी सांगितले. साक्री रोडवरील संभाजीनगर रुग्णालयासाठी पालकमंत्री जयकुमार रावल यांनी २५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. तेथे सीटी स्कॅन यंत्र मंजूर करण्यात आले आहे. नागरिकांना हे सीटी स्कॅन अवघ्या एक हजार रुपयांत उपलब्ध करून देण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ए.बी. फाउंडेशनचे अध्यक्ष कमलेश देवरे यांनी केले. सूत्रसंचालन भाजप जिल्हा उपाध्यक्ष पृथ्वीराज पाटील यांनी केले.

## महिला हत्येचा उलगडा

चाळीस वर्षीय सुनंदा गोटू चौधरी रा रहिलेचा मृतदेह बेवारस आणि संशयास्पद स्थितीत आढळला होता. त्राबाबत माहिती मिळताच पिंपळनेर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक नामदेव सहारे पथकासह तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी वेगाने तपास केला. तपासादरम्यान समोर आले की, नऊ ऑगस्टला दुपारी चारच्या सुमारास वाकी शिवारातील शेतात शेती कामाच्या कारणावरून मृत सुनंदा चौधरी आणि त्यांचे पती गोटू गन्साराम चौधरी यांच्यात जोरदार वाद झाला होता. या वादातून संशयित पती गोटू चौधरी याने पत्नीच्या डोक्यात आणि कपाळावर दगड घालून तिची हत्या केली आणि घटनास्थळावरून पोबारा केला. घटना घडल्यानंतर पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या पथकाने तांत्रिक माहिती आणि गुप्त बातमीदारांच्या आधारे शोधमोहीम राबवून अवघ्या दोन तासात संशयित पती गोटू चौधरी याला ताब्यात घेतले. पोलिसांनी पोलिसी खाक्या दाखवताच त्याने स्वतःच्या पत्नीची हत्या केल्याची कबुली दिली. या प्रकरणी पिंपळनेर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीर न्रार संहितेच्या कलम १०३ (१) अन्वये हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलिस निरिक्षक नामदेव सहारे, पोलिस उपनिरिक्षक संदीप संसारे, ईश्वर शिरसाठ, राजेंद्र मोरे, कांतीलाल अहिरे, विश्वास हजारे, कैलास कोळी, हिराबाई ठाकरे तसेच एलसीबीच्या पथकाने ही कारगिरी केली.

# ऊसतोड कामगारांच्या नोंदणीला ऊत्स्फूर्त प्रतिसाद मा.आ.कुणाल पाटील यांच्या प्रयत्नाने आयोजित




**धुळे, दि.१०– समाजातील वंचित घटकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा, त्यांचे जीवनमान उंचावे म्हणून ऊसतोड कामगारांची मोफत नोंदणी करण्याची मोहिम हाती घेतली आहे. तालुक्यातील प्रत्येक समाजातील घटकाच्या प्रगतीसाठी मी सदैव प्रयत्नशील असतो,प्रत्येक माणसाच्या समस्या सोडविण्यासाठी मी सदैव तत्पर असतो.प्रतिपादन माजी आ.कुणाल पाटील यांनी आदिवासी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात केले.मा. आ.कुणाल पाटील यांच्या पुढाकाराने हेंद्रुण येथे आयोजित ऊसतोड कामगार मोफत नोंदणी शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून यावेळी प्रत्येक ऊसतोड कामगारांची नोंदणी मोफत करण्यात आली.**

धुळे तालुक्यात मा.आ.कुणाल पाटील यांच्या नेतृत्वाखाली धुळे तालुक्यातील प्रत्येक गावात ऊसतोड कामागार नोंदणी शिबीर राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने या मोहिमेचे धुळे ग्रामीणचे मा.आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते आदिवासी दिनानिमित्ताने हेंद्रुण ता.धुळे येथे शुभारंभ करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात बोलतांना मा.आ.कुणाल पाटील यांनी सांगितले कि, धुळे तालुक्यातील प्रत्येक माणसाच्या समस्या सोडविण्यासाठी मी सदैव तत्पर असतो. तालुक्यात विकासाची कामे व्हावीत यासाठी कायमच प्रयतक्शील असतो. आज भाजपा महायुतीचे सरकार राज्यातील जनतेच्या कल्याणासाठी विविध कल्याणकारी योजना राबवित आहे. त्यामुळे कल्याणकारी योजनांपासून धुळे तालुक्यातील एकही घटक वंचित राहू नये म्हणून आम्ही मोहिम हाती घेतली आहे. शासनाच्या प्रत्येक योजनेचा शेवटच्या माणसला लाभ व्हावा म्हणून नियोजनबध्द कार्यक्रम राबविले जात आहेत. ऊसतोड कामगार हे आपल्या कामानिमित्ताने बाहेरगावी जात असतात त्यामुळे त्यांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळत नाही म्हणून अशा कामागारांसाठी मोफत नोंदणी शिबीर घेण्यात येत आहे. त्यामुळे त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे असे प्रतिपादन मा.आ.कुणाल पाटील यांनी केले. यावेळी माजी पं.स.सभापती भगवान गर्दे, माजी जि.प.सदस्य अरुण पाटील,बाजार समितीचे उपसभापती संभाजी राजपूत,डॉ. चंद्रकांत राजपूत, मंगलसिंग राजपूत, माजी सरपंच राजू पाटील, संतोष पाटील, सामाजिक कार्यकर्ते पप्पू भदाणे, उध्दव राजपूत, सुनिल मुकडदम, दगडू नवसारे, वनसिंग राजपूत, शिवाजी राजपूत, सोनू नवसारे, राहूल राजपूत,बाबाजी राजपूत, समाधान भिल, छोटू वाघ, कल्पेश राजपूत,अजबराव पाटील आदी उपस्थित होते.

## आमोदा येथे आदिवासी दिन उत्साहात साजरा

**शहादा,दि.१०(प्रतिनिधी)– सद्गुरु विद्या प्रसारक मंडळ मडकाणी संचलित, माध्यमिक विद्यालय आमोदा (ता. शहादा) येथे जागतिक आदिवासी दिवस विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी व रॅली काढून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आदिवासी क्रांतिवीर भगवान बिरसा मुंडा व इतर महानायकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व शस्त्र पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे समन्वयक अमृतरावजी पाटील होते.**

प्रमुख पाहुणे म्हणून माजी पं.सदस्य सत्येन वळवी, मडकानीचे सरपंच विनोद ठाकरे, सामाजिक कार्यकर्ते डॉ. जाधव ठाकरे, विकास ठाकरे, अर्जुन ठाकरे, दिलीप वाघ, अनिल पवार उपस्थित होते. कार्यक्रमात कवी संतोष पावरा यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी जय जोहार – जय आदिवासी, क्रांतीसुर्य बिरसा मुंडा–जिंदाबाद अशा घोषणांनी परिसर दुमदुमून निघाला. या निमित्ताने उपस्थितांनी आपल्या परंपरा, संस्कृती आणि हक्कांचे रक्षण करण्याचा संकल्प केला. शाळेतर्फे उपस्थितांचा शॉल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

पान १ वरुन

## पुर्णाकृती पुतळा उभा करा

**आणि नगरपंचायतीवर मोर्चा काढत जुन्या मागणीसाठी उठाव करून नवीन ठराव नगरपंचायत मुख्याधिकारी यांनी करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्ण कृती पुतळा गोल्डीचौकात उभारण्यासाठी शासकीय प्रक्रिया राबवावी अशी मागणी करण्यात आली.**

साक्री शहरातील नवापूर धुळे रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याची मोहीम सार्वजनिक बांधकाम विभागाने हाती घेतली असून अतिक्रमणधारक,दुकानदार, व्यापारी यांची नावे घेऊन केलेल्या अतिक्रमण काढून घेण्या संदर्भ माहिती दिली आहे. आंबेडकरवादी कार्यकर्त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथून शहरातील प्रमुख मार्गावरून मोर्चा काढत निवासी नायब तहसीलदार किरण कोठावदे आणि नगरपंचायतीचे मुख्याधिकारी तुषार सोनवणे यांना निवेदन दिले. यावेळी कमलाकर मोहिते, सतीश मोहिते,राजेंद्र सामुद्रे, राजेंद्र वाघ, जी.टी.मोहिते, दीपक वाघ, प्रवीण सोनवणे, राजाराम बच्छाव, नाना वाघ, रजनीकांत वाघ, देविदास वाघ, नाना मोरे, हेमंत वाघ, अनिल मगर, कपिल वाघ, प्रकाश वाघ, बाबा बेडसे, हरिष सूर्यवंशी, शरद वाघ, जगदीश वाघ, अतुल जाधव, संगपाल मोरे, बंटी मोरे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

पाहिजेत
• नर्स (ANM GNM)
• R.M.O
• रिसेप्शनिस्ट
• B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट
संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

पाहिजेत
1) Helper - 3
2) Office Boy- 2
3) Electrician - 2
4) Project Manager-1
-:संपर्क:-
चैतन्य टेलिकॉम
गरुड कॉम्प्लेक्स, कमलाबाई शाळेसमोर, साक्री रोड, धुळे.
9225606888

फार्म हाऊसवर राखणदार पाहिजे
फागणा येथे फार्म हाऊसवर कुटुंबासह राखणदार पाहिजे, रहायला पक्के घर, विज, पाणी सर्व मिळेल वय साठ वर्षा पर्यंत, फागणा सर्व सुविधा आहेत. भेटा धुळे येथे सर्व माहितीसाठी
०८८८८८२०५६५

पाहिजेत
टायपिस्ट म्हणून मुलगा/ मुलगी पाहिजेत. इच्छुकांनी सायंकाळी ६ वाजता समक्ष भेटावे.
अनुभवी व्यक्तीस प्राधान्य
श्रीविनायक डायग्नोस्टीक सेंटर
हॉटेल गणपती पॅलेस समोर, मालेगाव रोड, धुळे

दुकान विकणे आहे
मुख्य बाजारपेठ मधील गल्ली नं.४ येथील बालाजी मंदिरासमोर क्षेत्र (१०.०१) चौ.मी दुकान योग्य किंमतीत विकणे आहे.
– संपर्क –
8830291946

विकणे आहे
वलवाडी गोंदूर रोड दुकान फर्निचर पीओपीसह विकणे आहे. व भोकर शिवारात विमानतळ फाटा सर्व्हे नं.९/१/२ मधील प्लॉट विकणे आहे.
9011894666

पाहिजे
ऑफिस कामासाठी
Video Editor व Computer Operator
पाहिजे
-: संपर्क :-
7666176855
अभय कॉलेज रोड, राम नगर, धुळे

पाहिजेत
कुसुंबा ते अक्कलपाडा दरम्यान शेती पाहिजे; हायवेटच ६ ते १० एकर पर्यंत विहिर किंवा बोअर असणाऱ्यास प्राधान्य ! टायटल फ्री आवश्यक !!
संपर्क : निरज अग्रवाल, अमळनेर
मो.9309782011
वेळ : संध्याकाळी ७ ते ८ पर्यंत

पाहिजेत
दाताच्या दवाखान्याच्या कामासाठी पुर्णवेळ, अर्धवेळ, मुलगा–मुलगी पाहिजे.
9823546330

शेती विकणे आहे
खाते नं. २०१, भुमापन व उपविभाग क्र. ६३३/१ बोअरिंग १, सौर उर्जा बसविले आहे. : १ एकर खामगाव रोड इंग्लीश मेडियमचे पाठी मागे नंदुरबार
: संपर्क :
बिंदीया रमेश साळवे
7066559455
9422288948

पाहिजेत
होलसेल मेडिकलमध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत.
१)कॉम्प्युटर ऑपरेटर अकाऊन्टंट
२) सेल्समन बाहेर गावांसाठी
३) मदतनीस
–: संपर्क :–
संजय मेडिकल्स
गल्ली नं. २ धुळे

Godrej
27 वर्षांपासून गोदरेज कंपनीचे एकमेव अधिकृत डिलर.



आजच खरेदी करा गोदरेजचे प्रॉडक्ट आणि मिळवा भव्य रोख सुट
BAJAJ FINSERV
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
फायनान्सला लागणारी कागदपत्रे
1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक
नियम व अटी लागू*
ak media- 238222
59 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे–४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा–२५६९३९, मालेगाव–२४३१३३६, नाशिक–२५७५९८९, पुणे–९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र–रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०